## जनसंपर्क विभाग

**बातमी - १**

जळगाव ०६ ( ) शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्यासाठी जैविक, शाश्वत आणि सर्व समावेशक अशा दुसऱ्या हरीतक्रांतीची गरज असल्याचे प्रतिपादन कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे माजी कुलगुरू तथा रायसोनी विद्यापीठाचे विद्यमान कुलगुरू प्रा.सुधीर मेश्राम यांनी केले.

अमळनेर येथील प्रताप तत्त्वज्ञान केंद्रात प्रयोगशाळा ते जमीन उपक्रमांतर्गत ६ व ७ जून रोजी निवासी शेतकरी प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. या कार्यशाळेच्या उद्‌घाटन प्रा.मेश्राम यांच्या हस्ते झाले. यावेळी कुलगुरू प्रा.पी.पी.पाटील अध्यक्षस्थानी होते. यावेळी मंचावर तत्त्वज्ञान केंद्राचे मानद संचालक डॉ.एस.आर.चौधरी, कार्याध्यक्ष प्रा.सुधीर पाटील उपस्थित होते.

प्रा.सुधीर मेश्राम यांना ग्लोबल बायोटेक फोरमच्या वतीने काही महिन्यांपूर्वी जीवन गौरव पुरस्कार प्राप्त झाला. ही पुरस्कारप्राप्त रक्कम खान्देशातील आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या सहा कुटुंबांना आर्थिक मदत म्हणून प्रा.सुधीर मेश्राम यांनी या समारंभात दिली. यामध्ये जळगाव जिल्ह्यातील कै.नथू नांद्रे (मु.पो.छडवेल पखरून, ता.साक्री, जि.नंदूरबार), कै. दीपक धोबी (मु.पो.मेहेरगाव, ता.जि.धुळे), कै.सागर पाटील (कुकावल, ता.शहादा), कै.बन्सिलाल तांबोळी (रनाळे,ता.जि.नंदूरबार), कै.भिमराव वाघ (मु.गोरनाळे, ता.जामनेर,जि.जळगाव), कै.अनिल साळुंखे (मु.चांदसर, ता.धरणगाव, जि.जळगाव) या सहा आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या परिवाराला हे अर्थसहाय्य करण्यात आले.

प्रा.मेश्राम यावेळी बोलताना म्हणाले की, आपल्याकडे खरीप हंगामावर शेतकरी जास्त अवलंबून आहे. हवामान बदलाचा मोठा परिणाम शेतीवर होतो आहे अशा परिस्थितीत स्वदेशी आणि शाश्वत स्वरूपाचे तंत्रज्ञान विकसित करण्याची गरज आहे. जैविक खते आणि जैविक किटकनाशके यांचा वापर कसा करावा याबाबत प्रयोगशाळा ते जमीन या उपक्रमांतर्गत खानदेशात अनेक कार्यशाळा घेण्यात आल्या. त्यासाठी आपले पेटंट खुले करून दिले. ज्या भागात या कार्यशाळा घेण्यात आल्या त्या भागात शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या नाहीत याकडे त्यांनी लक्ष वेधले. दूर्गम भागापर्यंत व सर्व समावेशक असे शेती धोरण आखून त्यांना मुख्य प्रवाहात आणण्याची गरज आहे असेही ते म्हणाले. ग्लोबल बायोटेक फोरम त्यासाठी प्रयत्न करत असल्याचेही त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू प्रा.पी.पी.पाटील यांनी प्रा.सुधीर मेश्राम यांच्या सामाजिक बांधिलकीचे कौतूक करून प्रयोगशाळा ते जमीन हा उपक्रम भविष्यात ही विद्यापीठाकडून सुरू राहणार असल्याचे सांगुन त्यासाठी अर्थसंकल्पात तरतूद केल्याची माहिती दिली. विद्यापीठाला आता समाजापर्यंत जावे लागेल, कमी खर्चात अधिक शेतीची उत्पादन कसे वाढता येईल यासाठी विद्यापीठाकडून भविष्यातही निवासी कार्यशाळा घेतल्या जाणार असल्याचे प्रा.पाटील यांनी सांगितले.

पान २ वर

## जनसंपर्क विभाग



प्रास्ताविक समन्वयक प्रा.भुषण चौधरी यांनी केले. प्रा.एस.आर.चौधरी यांनी प्रताप तत्त्वज्ञान केंद्राचा आढावा सांगितला. प्रा.सुधीर पाटील यांनी देखील यावेळी मनोगत व्यक्त केले. प्रा.राधिका पाठक यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. पीएच.डी प्राप्त झाल्याबद्दल तत्त्वज्ञान केंद्र सल्लागार समितीचे प्रा.धीरज वैष्णक, तंत्रज्ञ अधिकारी स्वप्नील खरे यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन स्वप्नील खरे यांनी केले. अधिसभा सदस्य दिनेश नाईक यांनी आभार मानले. यावेळी प्राचार्य ज्योती राणे, डी.डी.पाटील, प्रा.सुनील गरूड, प्रा.धर्मसिंह पाटील आदी उपस्थित होते. या दोन दिवसीय कार्यशाळेत ४० शेतकरी बंधू-भगिनी सहभागी झाले आहेत. उद्घाटनानंतर प्रा.भुषण चौधरी, प्रा.ए.बी.चौधरी यांनी जैवतंत्रज्ञानाच्या आधारे शेती या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले.

**बातमी - २**

जळगाव ०६ (                ) खासदार उन्मेष पाटील यांनी गुरूवार दिनांक ६ जून रोजी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाला भेट देवून सर्व अधिकारी - कर्मचाऱ्यांचे आभार मानले. यावेळी अधिकाऱ्यांसमवेत झालेल्या बैठकीत विद्यापीठातील विविध प्रश्न शासन दरबारी मार्गी लावण्यासाठी पूर्ण प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

नवनिर्वाचित खासदार उन्मेष पाटील यांचा हा आभार दौरा होता. विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीतील प्रत्येक विभागांमध्ये व्यक्तिशः जावून त्यांनी सर्वांचे आभार मानले. विद्यापीठातील अधिकाऱ्यांसमवेत झालेल्या बैठकीत त्यांनी विद्यापीठाचे सर्व प्रश्न अधिकाऱ्यांकडून जाणून घेतले. कर्मचारी संघटनेने खासदार पाटील यांना मागण्यांचे निवेदन दिले. पाण्यासाठी स्वतंत्र बंधारा, नंदूरबार येथील आदिवासी अकादमीसाठी निधी, कर्मचारी भरती, शासनाकडे थकित असलेले अनुदान, भुसंपादनाची शासनाकडे बाकी असलेली रक्कम आदी विषय यावेळी खासदारांकडे मांडण्यात आले. शिक्षण हे आपल्या आवडीचे क्षेत्र असून या विद्यापीठातूनच आपली जडण-घडण घडली आहे त्यामुळे विद्यापीठाचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी पूर्ण प्रयत्न करणार असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले. विद्यापीठ विकासाच्या योजना अगोदर निश्चित करा शासनाकडून निश्चितच त्यासाठी निधी पदरात पाडून घेवू असेही ते म्हणाले.

कुलगुरू प्रा.पी.पी.पाटील, प्र-कुलगुरू प्रा.पी.पी.माहुलीकर, व्य.प.सदस्य दिलीप पाटील, प्रा.नितीन बारी, प्रा.जितेंद्र नाईक, कुलसचिव भ.भा.पाटील, वित्त व लेखाअधिकारी एस.आर.गोहिल, रासेयोचे संचालक प्रा.पंकजकुमार नन्नवरे यांच्या उपस्थितीत ग्रंथालयानजीक खासदार उन्मेष पाटील यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. प्रा.माहुलीकर यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. दिलीप पाटील यांनी प्रास्ताविक केले. कुलसचिव भ.भा.पाटील यांनी आभार मानले.

---

जा.क्र. : कबचौ उमवि/१६/हस्तदेय/२०१९ दिनांक : ६ जून, २०१९

प्रति,
मा. संपादक / प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

स्वाक्षरीत //--
(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी

☎ : (९१) ०२५७- (२२५७२४८, २४९, २५३) वेबसाईट : www.nmu.ac.in
फॅक्स : (९१) ०२५७- (२२५८४०३, ४०६) ई-मेल : pro@nmu.ac.in